# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/विवि/पीसीआय/माहिती/२०१९/३४४
दिनांक : 19 JAN 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या,
औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,
(पुणे विभाग पुणे).

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-२०१९ करीता औषधनिर्माणशास्त्र या पदविका अभ्यासक्रमांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता नसलेल्या संस्थांनी सदर मान्यता ०६ महिन्याच्या कालावधीत सादर करणेबाबतचे हमीपत्र सादर केलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० चे प्रवेश प्रक्रीयेतून वगळणेबाबत...**

संदर्भ :- संचालनालयाचे पत्र क्रमांक : १०/एनजीपी/पीसीआय/प्रवेश/२०१८/१४५०, दि.१९/१२/२०१८.

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास (सोबत प्रत जोडली आहे) अनुसरुन, आपणांस कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या, ज्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास, विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासकम सुरु करणे, सुरु असलेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे, विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या मान्यतेस मुदतवाढ (EOA) यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता मिळालेली आहे, अशा संस्थांनी त्यांचे औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली असल्यास, सदर मान्यता पत्र अथवा मान्यता घेतलेली नसल्यास मान्यता ०६ महिन्याच्या कालावधीत सादर करणेबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र तात्काळ सादर करण्याबाबत यापूर्वी आपणास कळविण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने उपरोक्त विषयांकित मान्यता मिळालेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या काही संस्थांनी संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली नसल्यामुळे, मान्यता ०६ महिन्याच्या कालावधीत सादर करणेबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र संचालनालयास सादर केलेले होते. सदर हमीपत्रानुसार ०६ महिन्यांची मुदत पूर्ण झालेली आहे, परंतु ब-याच संस्थांची याबाबतची माहिती अद्याप या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

तरी या पत्राव्दारे आपणास पुन्हा कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली नसल्यामुळे, ज्या संस्थांनी सदर मान्यता ०६ महिन्याच्या कालावधीत सादर करणेबाबतचे नोदणीकृत हमीपत्र यापूर्वी सादर केलेले आहे, अशा सर्व संस्थांनी, संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचे **मान्यता आदेश** खास दूतामार्फत **दिनांक २२/०१/२०१९ पर्यंत** या कार्यालयास हस्तदेय सादर करावेत.

याबाबत आपल्या असेही निदर्शनास आणून देण्यात येते की, ज्या संस्था शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची मान्यता या कार्यालयामार्फत सादर करणार नाहीत, अशा संस्थेतील पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाचा समावेश शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही व यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार राहील याची नोद घ्यावी.

तसेच ज्या संस्थांच्या प्रवेशक्षमतेचा मा. न्यायालयाच्या आदेशानुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेमध्ये समावेश करण्यात आला होता, अशा संस्थांनी मा. न्यायालयाच्या नवीनतम (latest) आदेशाची प्रत प्राप्त करुन घ्यावी व ती विहीत मुदतीत सोबतच्या प्रपत्रामध्ये तयार करुन, या कार्यालयास सादर करावी.

Pravinwad 15.1.19

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या सकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

**Table : Post HSC Diploma in Pharmacy Institute's PCI approval Information**

| SN | DTE Code of Institute | Name of Institute | Sanctioned Intake as per AICTE EoA 2018-19 | PCI approval for/upto Year (2017-18, 2018-19, 2019-20 etc) **(Mention Year)** | Sanctioned Intake as per PCI for/upto Year mentioned in column no. 5 | PCI approval Letter outward Number and Date | Remark (Mention remark if any regarding Court Case etc.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

Name and Signature of Joint Director
Region Name:

Note:

1. Each Instiute shall put DTE Institute code on top right corner of PCI approval Letter and send the copy to respective regional office
2. for Regional Offices: Above Table is to be sorted out as per ascending order of Column 2; The PCI approval letters of all Instiutes shall be arranged accordingly for scanning. All Scanned PCI approvals arranged as per Institute DTE code in single scanned copy and above Table in Excel format is to be sent to desk10@dtemaharashtra.gov.in and by Post as per time limit given in covering letter.